# गणू घड्याळ वाचायला शिकतो -





गणूच्या घरी मोठे घड्याळ आहे.
ते भिंतीवर बसवले आहे. घड्याळाचा
लंबक सारखे झोके घेत असतो.

किती वाजले हे कसे ओळखायचे?
घड्याळात तासाचे ठोके पडतात.
गणू ठोके मोजतो.
९ ठोके पडले म्हणजे ९ वाजले. १० ठोके
पडले म्हणजे १० वाजले हे
कळते. त्यासाठी घड्याळाकडे
पहावे लागत नाही.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४००००५
प्रकाशक : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन,
पुणे-४११०२९



गणूने बाबांना विचारले -

"हाताच्या घड्याळात ठोके पडत नाहीत. मग किती वाजले हे कसे ओळखायचे ?"

गणूच्या बाबांनी गणूला एक युक्ती सांगितली.
बाबा म्हणाले, "घड्याळात आकडे लिहीले आहेत ते वाच."
काही आकडे गणूने ओळखले.
12, 1, 2, 3, 10, 11 बरोबर सांगितले.
उरलेले आकडे ओळखता येईनात.




बाबा म्हणाले, "आकडे ओळीत येतात.
1 च्या पुढे 2, 11 च्या पुढे 12.
आता गणूने 4, 5, 6, 7, 8, 9 हे आकडे वाचले.

गणूच्या बाबानी गणूला कागद दिला.
गणूने बांगडीने कागदावर वर्तुळे
काढली. घड्याळात असतात तसे
12 आकडे लिहिले.
बाबा म्हणाले, "चित्रात घड्याळाचे
काटे काढू नकोस."
९ वाजता ९ ठोके पडतील.
९ ठोके पडले की काटे कोणत्या आकड्यावर आहेत ते पहा.
तसेच काटे चित्रात काढ.






९ ठोके पडले.

गणूने असे चित्र काढले.
किती ठोके पडले ते चित्राखाली
लिहिले.

संध्याकाळी बाबा शेतावरून आले.
गणूने घड्याळांची चित्रे बाबांना दाखवली.



९ ठोके पडले.



१० ठोके पडले.



११ ठोके पडले.



१२ ठोके पडले.



१ ठोका पडला.



२ ठोके पडले



३ ठोके पडले



४ ठोके पडले



५ ठोके पडले



६ ठोके पडले

बाबानी गणूला शाबासकी दिली.
बाबा म्हणाले, "८ वाजता घड्याळाचे चित्र कसे दिसेल ते काढ."
गणूने घड्याळाच्या चित्रात
८ वाजलेले कसे दाखवले ?



तुम्ही ह्या घड्याळात दाखवा.